



# डाळींब पिकाच्या विक्रमी व निर्यातक्षम उत्पादनासाठी व्यवस्थापन



**श्री. बी. डी. जडे**
वरिष्ठ कृषी विद्या शास्त्रज्ञ
जैन इरिगेशन सिस्टिम्स लि.,
जळगाव

डाळींब हे महाराष्ट्रातील प्रमुख फळझाडांपैकी एक प्रमुख पीक आहे. विशेष म्हणजे हे कोरडवाहू फळपीक असले तरी द्राक्ष, केळी, पेरू, संत्रा, मोसंबी या पिकांपेक्षाही अधिक अथवा बरोबरीने या पिकाने शेतकऱ्यांना नफा मिळवून दिलेला आहे. आणि म्हणूनच या पिकाचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढताना आढळून येत आहे. यापूर्वी फक्त सोलापूर, सातारा, पुणे, सांगली, नाशिक आणि अहमदनगर ह्या जिल्ह्यांमध्ये डाळिंबाचे क्षेत्र होते. आता तर ह्या पिकापासून अधिक नफा मिळतो. ह्याचा मोठा प्रचार आणि प्रसार झाल्याने विदर्भातील अकोला, नागपूर, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम; तर मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली तसेच खानदेशातील जळगाव, धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यांत सुद्धा डाळिंबाची लागवड झालेली आहे.

देशात ह्या डाळींब पिकाचे १,७५,००० हेक्टर एवढे क्षेत्र असून राज्यात १,२६,००० हेक्टर क्षेत्र आहे. ह्या पिकापासून अधिक नफा मिळतो म्हणून काही भागात अयोग्य जमिनी आणि अयोग्य हवामानात ह्या पिकाची लागवड झाल्याने काही शेतकरी अडचणीत आल्याचेही आढळून आले आहे.

मूळत: हे पीक कोरडवाहू फळझाड वर्गातील असून झुडूप आहे. ह्यास फांदीवर काटे आहेत तर पाने लहान आहेत. ह्या पिकाच्या पाणी आणि पोषण ह्यांच्या गरजा मर्यादित आहेत. परंतु ह्या पिकापासून एकरी ५ ते १० लाख रु. नफा मिळतो म्हणून मात्र शेतकरी कीटकनाशक, बुरशीनाशके, संजीवके, जीवाणूनाशकाच्या खूप फवारण्या करीत आहेत. गरज नसताना सर्व औषधांच्या एकत्रित फवारण्या शेतकरी करीत आहेत. पोषणाच्या बाबतीतही असंतुलित खतांचा शेतकरी वापर करीत आहे. कोणत्या अवस्थेत कोणत्या अन्नद्रव्यांचा पुरवठा केला पाहिजे ह्याबाबतीतही बरेच अनभिज्ञ आहेत. शेतकरी फर्टिगेशन करू लागले आहेत. परंतु त्यात बहार धरल्यापासून फळे काढणीपर्यंत नियमित किंवा सातत्य नसते. फर्टिगेशन पिकांच्यामध्ये अवस्थेनुसार अन्नद्रव्यांचा सातत्याने पुरवठा करणे अत्यंत महत्त्वाचे आणि गरजेचे असते. मुख्य अन्नद्रव्यांबरोबरच दुय्यम आणि सूक्ष्म अन्नद्रव्ये ह्याचा वापर पिकाच्या गरजेनुसार होणे गरजेचे आहे.

राज्यातील सर्वच डाळींब बागा ह्या ठिबक सिंचनाखाली आहेत ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. परंतु ह्या पिकास पाणी किती द्यावे ह्याबाबतीत मात्र शेतकऱ्यांनी पिकाच्या अवस्थेनुसार व जमिनीचा प्रकार/पोत बघून ठिबक सिंचनाने पाणी व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे. बऱ्याच ठिकाणी अजूनही शेतकरी डाळींब पिकासाठी मायक्रोट्यूब किंवा दोन ड्रिपर्सचा वापर करताना आढळतात. ड्रिपर्सचा प्रवाहसुद्धा ८ लिटर किंवा १४ लिटर/तासचे ड्रिपर्स वापरताना दिसतात. तसेच ठिबक सिंचन संच ८ ते १० तास सुरू ठेवताना आढळून येतात. तसे करणेही चुकीचे आहे. डाळींब पिकाला पाण्याची जास्त गरज नाही. खूप जास्त पाणी दिल्याने पिकांच्या पांढऱ्या मुळांजवळ जमिनीत वाफसा राहात नाही. त्यामुळे मुळांना पाण्याचे व खतांचे शोषण करता येत नाही. तसेच जादा पाणी दिल्यामुळे पांढरी मुळे काळपट होतात, तसेच अन्नद्रव्यांचा निचरा होऊन जातो. त्यामुळे जास्त पाणी व खते दिल्याने रिझल्ट मिळत नाही. फायदा होत नाही. म्हणून डाळींब पिकाचे अधिक व दर्जेदार निर्यातक्षम उत्पादन घेण्यासाठी ह्या पिकांच्या गरजा काय आहेत, ह्यांचा शेतकऱ्यांनी सूक्ष्म अभ्यास करण्याची गरज आहे. पिकाच्या उत्पादन मिळण्यात पाणी आणि पोषण ह्या दोन घटकांचा सिंहाचा वाटा आहे हे लक्षात घेऊन डाळींब पिकाची लागवड केल्यापासून पाणी आणि रासायनिक खतांचा ठिबक सिंचनामधून वापर करावा. हे करीत असताना पिकांच्या गरजेनुसार त्याचे नियोजन करावे. फर्टिगेशन रेग्युलर म्हणजे कोणताही खंड न ठेवता आठवड्यातून किमान दोन वेळा सातत्याने द्यावे. फर्टिगेशन केल्यावर ठिबकने फक्त ५ ते १० मिनिटे पाणी द्यावे. फर्टिगेशननंतर ठिबकने अधिक काळ पाणी देत राहिल्यास रासायनिक खते झिरपून जातील. ठिबक सिंचनामध्ये डाळिंबाकरिता मायक्रोट्यूब अथवा अधिक प्रवाहाचे ड्रिपर निवडू नये. ४ लिटर/तास प्रवाहाचे शक्यतो ड्रिपर निवडावे. पिकाच्या वयानुसार, अवस्थेनुसार डाळिंबाच्या झाडाला ड्रिपर्सची संख्या वाढवावी. ड्रिपर्सची जागासुद्धा अत्यंत महत्त्वाची असते. ज्या ठिकाणी पांढरी मुळे आहेत, त्याच ठिकाणी ड्रिपर्सने पाणी द्यावे. बऱ्याच वेळा ठिबक सिंचनच्या नळ्या अस्ताव्यस्त पडलेल्या असतात. किंवा ड्रिपर खोडाजवळ असतात. आणि तेथेच पाणी दिले जाते. त्यामुळे पाणी आणि रासायनिक खतांचे योग्य व्यवस्थापन होत नाही. म्हणून खोडाजवळ पाणी कधीही देऊ नये. दुपारी १२ वाजता डाळिंबाच्या झाडाच्या पडणाऱ्या सावलीच्या परिघामुळे पांढरी मुळे असतात. त्याच ठिकाणी सेंद्रिय खते, जैविक खते, रासायनिक खते, दुय्यम अन्नद्रव्ये, सूक्ष्म अन्नद्रव्ये आणि पाणी व्यवस्थापन करणे गरजेचे असते. असे केल्याने डाळिंबाचे विक्रमी उत्पादन तर मिळतेच; त्याचबरोबर फळांची उत्तम, निर्यातक्षम गुणवत्ताही मिळते.

जैन इरिगेशन सिस्टम्स लि

डाळींब पिकांची जोमदार वाढ होण्यासाठी, उत्पादनात वाढ होण्यासाठी, आकर्षक रंगाची दर्जेदार डाळिंबाची फळे मिळण्यासाठी पिकांचे पानाद्वारे पोषण करणेसुद्धा महत्त्वाचे ठरते.

पिकांचे पानाद्वारे पोषण ह्या पद्धतीत 'फोलीयर फिडींग' असे म्हणतात. 'फोलीयर फिडींग'मध्ये झाडाची उत्तम वाढ, पानाचा रंग गर्द हिरवा, मोठी पाने मिळण्याकरिता १९:१९:१९ ह्या विद्राव्य खताच्या १५ लिटर पाण्यात ४५ ग्रॅम खत विरघळून दोन फवारण्या कराव्यात. नत्राचा वापर अधिक झाल्यास झाडाची कायिक वाढ अधिक होईल आणि फुले उशिरा आणि कमी लागतील. त्यांची काळजी घ्यावी. फळधारणेपासून फळांचे आकारमान मोठा होईपर्यंत किंवा फळांतील दाण्यांचा रंग बदलण्यापूर्वी 0:५२:३४ ह्या विद्राव्य खताची १५ लिटर पाण्यात ६0 ग्रॅम खत विरघळून फवारणी करावी. फळांना आकर्षक रंग व चकाकी येण्यासाठी फळांमध्ये गोडी व वजन वाढण्यासाठी १३:0.४५ ह्या विद्राव्य खतांची १५ लिटर पाण्यात ७५ ग्रॅम खत विरघळून फवारणी करावी. शक्यतो अधिक कीटकनाशके, बुरशीनाशके, जीवाणू नाशके, विद्राव्य खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये ह्या सर्वांची एकत्रित फवारणी करू नये. कारण ही सर्व औषधी विद्राव्य खते १५ लिटर पाण्यातच



पंपात टाकली जाणार असल्याने द्रावणाची तीव्रता खूप वाढते. त्यांचा पानावर विपरीत परिणाम होतो. कधी कधी पानांवर स्कॉर्चिंग येते. पाने पिवळी पडतात. नंतर गळून पडतात. त्यामुळे गरजेनुसारच औषधी निवडून फवारणी करावी. गरजेपेक्षा अधिक फवारणी करू नये. डाळींब हे पीक कोरडवाहू फळझाड आहे हे नीट लक्षात ठेवावे. कोणत्याही घटकांचा/बाबींचा अतिरेक होणार नाही याची काळजी घ्यावी. डाळींब पिकाचे अवस्थेनुसार, गरजेनुसार व्यवस्थापन करावे.

हवामानातील बदल हा मोठा विषय होत चालला आहे. राज्यात दर महिन्यास हवामानात बदल होताना दिसत आहेत. अवेळी पाऊस, अनियमित पाऊस, खंडीत पाऊस, कधी जास्त पाऊस, गारपीट, अधिक उष्ण तापमान, गरम वारे, थंडीची लाट, थंड वारे, चक्रीवादळ हे हवामानातील बदल आता तर नेहमी आढळून येत आहेत. ह्या बदलानुसार डाळींब पिकाचे योग्य व्यवस्थापन करणे तारेवरची कसरत आहे. तरी ते करावे लागणार आहे.

बरेच शेतकरी अनुकरण करतात. परंतु अनुकरण करताना आपल्या डाळींब बागेची गरज ओळखून करावे. गरज नसताना केल्यास खर्च तर वाढतोच; शिवाय आपले नुकसानही होते. म्हणून डाळींब पिकाचे विक्रमी आणि निर्यातक्षम उत्पादनासाठी योग्य जमिनीत लागवड शिफारशीनुसार लागवडीचे अंतर, लागवडीसाठी रोगमुक्त रोपांचा वापर, टिश्युकल्चर रोपे खात्रीशीर, जोमदार आणि रोगमुक्त असतात. त्यांचाच वापर लागवडीसाठी करावा, भगवा जात निवडावी, जमिनीत पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. लागवड गादी वाफ्यावर करावी, लागवडीपूर्वी ठिबक सिंचनाची उभारणी करून घ्यावी. फर्टिगेशन करण्यासाठी व्हेंच्युरी किंवा फर्टिलायझर टँक बसवून घ्यावा.

डाळिंबाचे क्षेत्र १० एकरहून अधिक असल्यास ऑटोमेशन करून घ्यावे. ऑटोमेशन केल्यामुळे पाण्याचे अचूक व्यवस्थापन करता येते. अगदी रात्रीसुद्धा शेतामध्ये जाऊन ठिबकचे व्हॉल्व्ह बदलण्यासाठी किंवा चालू-बंद करण्यासाठी जावे लागत नाही. ठिबकमधून खते देण्यासाठी ऑटोमेशन सोबत न्यूट्रीकेयर अथवा डोझींग पंपाचा वापर करता येतो. डाळिंबाच्या ट्रेनिंग आणि प्रुनिंग (छाटणी) योग्य पद्धतीने करावे. झाडाची वाढ व्यवस्थित पूर्ण झाली, फांद्या पेन्सिली जाडीची तपकिरी झाल्यानंतर बहर घेण्याचे नियोजन करावे. तरीही १८ महिन्याआधी बहर शक्यतो धरू नये. बहर धरताना पिकांना पुरेसा ताण बसणे गरजेचे आहे. ताणाचा कालावधी जमिनीच्या प्रकारानुसार बदलतो हे ध्यानात घ्यावे. ताण सोडताना सेंद्रिय खताचा आणि रासायनिक खतांचा, दुय्यम अन्नघटक व सूक्ष्म अन्नद्रव्यांचा बेसल डोस सेंद्रिय खतांमध्ये मिसळून जमिनीत दुपारी १२ वाजता पडणाऱ्या सावलीच्या परिघामध्ये चर काढून जमिनीत मिसळावे. नंतर ठिबक सिंचनाद्वारे पाणी व्यवस्थापन करावे. ठिबक सिंचनातून विद्राव्य खतांचा पिकाच्या अवस्थेनुसार नियमित उपयोग करावा. ठिबकने जादा पाणी देऊ नये. अशा पद्धतीने डाळींब पिकाचे व्यवस्थापन करावे. डाळिंबाचे विक्रमी आणि निर्यातक्षम उत्पादनासाठी वापरण्यात येणाऱ्या निविष्ठांची कार्यक्षमता ९० टक्केपेक्षा अधिक मिळण्यासाठी त्याचे योग्य नियोजन आणि व्यवस्थापन करणे महत्त्वाचे आहे. बागेत परिस्थितीनुसार त्वरित बदल करावेत.

